आपलं महानगर

# 'के. के. वाघ'च्या आठ शाखांना एनबीए मानांकन

## मानांकन मिळवणारे पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय

**नाशिक** ▸▸ के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या महाविद्यालयातील आठ विभागांना नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रिडिटेशन (एन.बी.ए.), नवी दिल्ली यांच्याकडून मानांकन प्राप्त झाले आहे. अॅक्रिडिटेशनचे परिक्षण आऊटकम बेस्ड एज्युकेशन मूल्यमापन पद्धतीने करण्यात आले. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आठ विभागांना एकत्रितपणे मानांकन मिळवणारे हे पुणे विद्यापीठ क्षेत्रातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय ठरले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. नांदूरकर म्हणाले, अॅक्रिडिटेशन प्रक्रियेमध्ये २०१६-१८ दरम्यान के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयास तज्ज्ञ समितीने भेट देवून संगणक, प्रॉडक्शन, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन या पाच विभागांचे परिक्षण करुन मूल्यमापन केले. समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. यज्ञदत्त शर्मा यांच्यासह १० तज्ज्ञ उपस्थित होते. दुसऱ्या टप्प्यात ११ ते १३ ऑक्टोबरदरम्यान समितीने पुन्हा महाविद्यालयास भेट देत इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल आणी एमसीए या विभागांची पाहणी करत परिक्षण करुन मूल्यमापन केले. दोन्ही समितीने अहवाल एन.बी.ए.कडे सादर केला. त्यानंतर एनबीएने निकाल जाहीर करत पदवी अभ्यासक्रमांच्या सात विभागांना तीन वर्षांसाठी एनबीए मानांकन दिले तर एमसीए पदव्युत्तर अभ्यासक्रमास दोन वर्षांसाठी मानांकन दिले. महाविद्यालयास एनबीएकडून २००३, २०१२ व २०१९ असे एकूण तीन वेळा मानांकन प्राप्त झाले आहे. महाविद्यालयास केंद्रीय मनुष्यबळ खात्याकडून एनआयआरएफ सर्व्हेमध्ये राज्यात नववा व देशात ५ व्या क्रमांकाचे स्थान प्राप्त केले आहे.

यावेळी के. के. वाघ संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी संस्थेच्या वाटचालीचा इतिहास सांगितला. तर डॉ. साने यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबाबत माहिती दिली. पत्रकार परिषदेस समीर वाघ, डॉ.पी.जे.पवार, संजीव अहिरे, प्रसाद जगताप यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.




### असा झाले महाविद्यालयाचे परीक्षण

तज्ज्ञ समितीने महाविद्यालयातील इमारत, प्रयोगशाळा, ग्रंथालय, व्यायामशाळा, मैदान, उत्कृष्ट निकालाची परंपरा, प्लेसमेंटची संख्या व हमी, एन.एस.एस. युनिट, वसतिगृह, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर, अध्यापनांच्या नवीन पद्धतीचा अवलंब, पीएचडीप्राप्त प्राध्यापकांची संख्या, आर्थिक व्यवस्थापन याचे निरीक्षण केले. समितीने व्यवस्थापन सदस्य, प्राचार्य, विभागप्रमुख, कर्मचारी, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, औद्योगिक संस्थांचे प्रतिनिधी यांची संवाद साधत अभिप्राय घेतले. त्यानंतर समितीने अहवाल तयार केला.

## आठ विद्याशाखांचा समावेश

# के. के. वाघ अभियांत्रिकीला ‘एनबीए’चे मानांकन

▸▸ नाशिक । दि. २६ प्रतिनिधी

शहरातील के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेतील महाविद्यालयाच्या आठ विभागांना नॅशनल बोर्ड ऑफ अँक्रिडीटेशन (एन.बी.ए.) हे मानांकन प्राप्त झाले आहे. राज्यासाठी ही भूषणावह बाब असून संस्थेचे आठही विभाग तज्ज्ञ समितीच्या विविध काठिण्य पातळ्यांवर यशस्वी झाल्याने हे यश मिळाले आहे, असे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, विश्वस्त समीर वाघ आदी उपस्थित होते.

या प्रक्रियेमध्ये दिनांक १६ ते १८ ऑगस्टदरम्यान तज्ज्ञ समितीने महाविद्यालयास भेट देऊन कॉम्प्युटर, प्रोडक्शन, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन या पाच विभागांचे परिक्षण करून मूल्यमापन केले. या समितीचे अध्यक्ष व बरेली येथील इन्व्हरटीस विदयापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. यज्ञदत्त शर्मा आर्या यांच्यासह देशाच्या विविध नामांकीत विदयापीठातून आलेले १० तज्ज्ञ उपस्थित होते. दुसऱ्या टप्यात दि. ११ ते १३ ऑक्टोबर दरम्यान आयआयटी दिल्लीचे प्रा. बी. के. बेहरा यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या तज्ज्ञ समितीने भेट दिली व इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल आणि एमसीए या विभागांची पाहणी केली. या दोन्ही भेटीनंतर एनबीएकडे अहवाल सादर करण्यात आला. त्या आधारे निकाल जाहीर करण्यात आला. नविन मूल्यमापन पध्दतीने आठ विभागांना एकत्रितपणे मानांकन मिळवणारे के. के. वाघ अभियांत्रिकी महाविदयालय हे पुणे विदयापीठ क्षेत्रातील पहिले अभियांत्रिकी महाविदयालय ठरले आहे. संस्थेची सर्व सुविधायुक्त दिमाखदार इमारत, अत्याधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, परिपूर्ण व्यायामशाळा, भव्य मैदान, उत्कृष्ठ निकालाची परंपरा, प्लेसमेंटची संख्या व हमी, एन .एस. एस. युनिट, सर्वसुविधांनी परिपूर्ण असे मुला- मुलींचे वसतीगृह, शिक्षक-विदयार्थी गुणोत्तर, अध्यापनांच्या नवनवीन पध्दतीचा अवलंब, पी.एच.डी. प्राध्यापकांची संख्या, उत्कृष्ठ आर्थिक व्यवस्थापन या सारख्या अनेक बाबींचे बारकाईने प्रत्यक्ष निरिक्षण करून समितीने सविस्तर अहवाल तयार केला.

हे महाविद्यालय नाशिकमधील सर्वात जुने अभियांत्रिकी महाविदयालय असून सुमारे १५००० विदयार्थी या महाविदयालयातून उत्तीर्ण होवून देश/विदेशात महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. या महाविदयालयास एनबीएकडून यापूर्वी दोन वेळा मानांकन मिळाले होते. तसेच २०१६ साली या महाविदयालयास केंद्रिय मनुष्यबळ खात्याकडून करण्यात आलेल्या NIRF सर्व्हेमध्ये राज्यात ९ वा व देशात ८५ व्या क्रमांकाचे स्थान या पूर्वीच मिळाले आहे.

### गुणवत्तावाढीसाठी ‘एनबीए’

या अँक्रिडीटेशनचा उद्देश म्हणजे महाविदयालये आणि विदयापीठे यामध्ये गुणवत्ता पूर्ण तांत्रिक शिक्षणाचा प्रचार करणे आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे हा आहे. तसेच या संस्थेमधून उत्तीर्ण होणाऱ्या विदयार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी व नोकरीत प्राधान्य मिळू शकते.

Deshdoot
27-12-2019

# ‘एनबीए’चे मानांकन

## के. के. वाघ कॉलेजचा सन्मान; आठ विद्याशाखांची निवड

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेज व रिसर्च सेंटरच्या आठ विद्याशाखांना नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन (एनबीए) हे मानाचे मानांकन प्राप्त झाले आहे. या मानांकनामुळे नाशिकच्या इंजिनीअरिंग शिक्षणाच्या क्षेत्रात मानाचा तुरा खोवला गेला आहे. आऊटकम बेस्ड एज्युकेशन या एनबीएच्या नवीन मूल्यमापन पद्धतीने आठ विभागांना एकत्रितपणे मानांकन मिळवणारे के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेज हे पुणे विद्यापीठ क्षेत्रातील पहिले इंजिनीअरिंग कॉलेज ठरले आहे.



या मूल्यांकनासाठी एनबीएच्या समितीने ऑगस्ट महिन्यात संस्थेत भेट देऊन कम्प्युटर, प्रॉडक्शन, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलीकम्युनिकेशन या पाच विभागांचे परीक्षण करून मूल्यमापन केले होते. या समितीचे अध्यक्ष म्हणून बरेलीच्या इन्व्हर्टिस विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. यज्ञदत्त श्मा आर्यांव त्यांच्यासमवेत विविध नामांकित विद्यापीठातून उपस्थित दहा तज्ज्ञ सहभागी झाले होते. या मूल्यांकनाचा दुसरा टप्पा ऑक्टोबरमध्ये पार पडला. यात आयआयटी दिल्लीचे प्रा. बी. के. बेहरा यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या समितीने परिक्षण करत इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल आणि एमसीए या विभागांची पाहणी केली. या भेटीत अध्यक्षांव्यतिरिक्त सहा तज्ज्ञ उपस्थित होते. या दोन्ही भेटीनंतर एनबीएकडे अहवाल सादर करण्यात आला होता.

या अहवाल पडताळणीनंतर नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या निकालात वाघ संस्थेतील आठ विद्याशाखांना एनबीए नामांकन जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये प्रॉडक्शन, कम्प्युटर, इलेक्ट्रिकल, केमिकल, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक्स आणि सिव्हिल तीन शैक्षणिक वर्षासाठी एनबीए मानांकन मिळाले तर एमसीए या पदव्युत्तर अभ्यासक्रमास दोन शैक्षणिक वर्षाचे मानांकन मिळाले. या ॲक्रीडिटेशनचे परीक्षण ‘आऊटकम बेस्ड एज्युकेशन’ या मूल्यमापन पद्धतीने करण्यात आले. सन् २००९ सालापासून एनबीएने या निकषावर मूल्यांकन सुरू केले आहे.

### या निकषांची प्राधान्याने तपासणी

एनबीएचे मानांकन हे राष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे समजले जाते. या परीक्षणात तज्ज्ञांच्या समितीने सुविधायुक्त दिमाखदार इमारत, अत्याधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, परिपूर्ण व्यायामशाळा, भव्य मैदान, उत्कृष्ट निकालाची परंपरा, प्लेसमेंटची संख्या व हमी, एनएसएस युनिट, सर्वसुविधांनी परिपूर्ण असे मुला-मुलींचे वसतीगृह, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर, अध्यापनांच्या नवनवीन पद्धतींचा अवलंब, पीएच.डी. प्राध्यापकांची संख्या, उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन आदी मुद्दे या परिक्षणात प्राधान्याने विचारात घेतले गेले. या भेटीदरम्यान समितीने व्यवस्थापन सदस्य, प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि औद्योगिक संस्थांचे प्रतिनिधी यांच्याशी चर्चा करून कॉलेजच्या बाबतीत त्यांचे अभिप्राय जाणून घेतले. या कॉलेजला नॅक ‘ए’ श्रेणी व एआयसीटीई-सीआय सर्व्हे ऑफ इंडस्ट्री लिंक्ड इन्स्टिट्यूटद्वारे प्लॅटिनम या सर्वोच्च श्रेणीने गौरविण्यात आले आहे. असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, समीर वाघ, शकुंतला वाघ व सचिव के. एस. बंदी यांनी प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, समन्वयक डॉ. पी. जे. पवार आदी मान्यवरांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुढारी

# वाघ अभियांत्रिकीला 'एनबीए'चे मानांकन

**नाशिक : प्रतिनिधी**

येथील के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था या महाविद्यालयाच्या आठ विभागांना नुकतेच नवी दिल्लीच्या नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडीटेशन अर्थात, 'एनबीए'कडून मानांकन प्राप्त झाले.

यामध्ये कॉम्प्युटर, प्रॉडक्शन, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल आणि एमसीए यांचा समावेश आहे. ॲक्रिडीटेशन प्रक्रियेमध्ये पहिल्या टप्प्यात ऑगस्टमध्ये प्रा. डॉ. यज्ञदत्त आर्या यांच्या समितीने तर दुसऱ्या टप्प्यात प्रा. बी. के. बेहरा यांच्या समितीने भेट देऊन मूल्यमापन केले. दोन्ही समित्यांनी एनबीएकडे अहवाल सादर केला. त्यावर आधारित निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. प्रॉडक्शन, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, केमिकल, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलीकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक्स आणि सिव्हिल या सात विभागांना तीन शैक्षणिक वर्षांसाठी तर एमसीए या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला दोन शैक्षणिक वर्षांसाठी मानांकन मिळाले.

ॲक्रिडीटेशनचे परीक्षण आउटकम बेस्ड एज्युकेशन या मूल्यमापन पध्दतीने करण्यात आले.

नवीन मूल्यमापन पद्धतीने आठ विभागांना एकत्रितपणे मानांकन मिळवणारे के. के. वाघ हे पुणे विदयापीठ क्षेत्रातील पहिले अभियांत्रिकी महाविदयालय ठरले आहे. परीक्षणादरम्यान तज्ज्ञांनी संस्थेची सर्वसुविधायुक्त अशी दिमाखदार इमारत, अत्याधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालय, व्यायामशाळा, उत्कृष्ट निकालाची परंपरा, प्लेसमेंटची संख्या व हमी, एनएसएस युनिट, सर्वसुविधांनी परिपूर्ण असे मुला - मुलींचे वसतिगृह, शिक्षक-विदयार्थी गुणोत्तर, पीएच. डी. प्राध्यापकांची संख्या, उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन या सारख्या अनेक बाबींचे बारकाईने प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, अशोक मर्चंट, चांगदेव होळकर, समीर वाघ, शकुंतला वाघ, के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, डॉ. पी. जे. पवार यांनी कौतुक केले.

# वाघ अभियांत्रिकीच्या आठ शाखांना एनबीएचे मानांकन

**प्रतिनिधी** | नाशिक

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आठ विद्याशाखांना नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन (एन. बी. ए.) चे मानांकन प्राप्त झाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ व प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२६ ते २८ ऑगस्टदरम्यान तज्ज्ञ समितीने महाविद्यालयास भेट देऊन कॉम्प्युटर, प्रॉडक्शन, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन या पाच विभागांचे मूल्यमापन केले. या समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. रुद्रदत्त शर्मा, आर्या, (कुलगुरू, इन्व्हर्टिस विद्यापीठ बरेली) हे होते. त्यांच्यासमवेत देशाच्या विविध विद्यापीठांतून आलेले ३० तज्ज्ञ सदस्य उपस्थित होते. दुसऱ्या टप्यात दि. ११ ते १३ ऑक्टोबरदरम्यान प्रा. बी. के. बेहरा, आय. आय. टी. दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली समितीने भेट दिली. इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल आणि एम.सी.ए. या विभागांची पाहणी केली होती. या समित्यांकडून एन. बी. ए. कडे अहवाल सादर करण्यात आला. त्याचा निकाल जाहीर झाला असून प्रॉडक्शन, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल या पदवी अभ्यासक्रमांच्या सात विभागांना तीन वर्षांसाठी तर एम.सी.ए. या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला

### या निकषांद्वारे मिळाले मानांकन

संस्थेची सर्व सुविधांयुक्त इमारत, अत्याधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, व्यायामशाळा, मैदान, उत्कृष्ट निकालाची परंपरा, प्लेसमेंट, एन.एस.एस. युनिट, वसतिगृह, अध्यापनाच्या नवीन पद्धती, पीएच.डी. प्राप्त प्राध्यापक, आर्थिक व्यवस्थापन यांसारख्या अनेक निकषांवर आधारित मुल्यमापन करण्यात आले.

दोन वर्षांसाठी एनबीएचे मानांकन मिळाले आहे. आउटकम बेस्ड एज्युकेशन या मूल्यमापन पद्धतीद्वारे २००९ पासून आंतरराष्ट्रीयस्तरावर होणाऱ्या मूल्यांकनाशी समकक्ष व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. अशाप्रकारे नवीन मूल्यमापन पद्धतीने आठ विभागांना एकत्रितपणे मानांकन मिळवून के. के. वाघ संस्थेने गुणवत्तेचा आलेख उंचावला आहे. विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, समीर वाघ, शकुंतला वाघ व सचिव के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, समन्वयक डॉ. पी. जे. पवार, सर्व अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने ही यशस्वी वाटचाल केली आहे.

**Divya Marathi**
**27-12-2019**

सकाळ

# के. के. वाघच्या आठ विभागांना एनबीए मानांकन

नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था या महाविद्यालयाच्या आठ विभागांना नुकतेच नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन (एनबीए) यांचे मानाकंन मिळाले आहे. प्रॉडक्शन, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, केमिकल, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल आणि एमसीए या अभ्यासक्रमांना मानांकन मिळाले आहे, अशी माहिती प्राचार्य के. एन. नांदूरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. अशा प्रकारे नवीन मूल्यमापन पद्धतीने आठ विभागांना एकत्रित मानांकन मिळविणारे के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय हे पुणे विद्यापीठ क्षेत्रातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय ठरले आहे. एमसीए या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला दोन वर्षांचे, तर बाकीच्या सात विभागांना तीन वर्षांसाठी एनबीएचे मानांकन मिळाले आहे. हे परीक्षण आउटकम बेस्ड एज्युकेशन या मूल्यमापन पद्धतीने करण्यात आले. २००९ पासून एनबीएने आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या मूल्यांकनाशी समकक्ष व्यवस्था निर्माण केली.

Nashik, Nashik-Today
27/12/2019 Page No. 5

सकाळ

# वाघ अभियांत्रिकीच्या आठ विभागांना एनबीए मानांकन

## तज्ज्ञ समितीच्या पाहणीनंतर बहुमान; पुणे विद्यापीठात पहिले महाविद्यालय

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २७ : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील आठ विद्याशाखांना नवी दिल्लीच्या नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रिडिटेशन (एनबीए) यांच्याकडून मानांकन मिळाले आहे. आउटकम बेस्ड एज्युकेशन (ओबीई) या नवीन मूल्यमापन पद्धतीने आठ विभागांना एकत्रितपणे मानांकन मिळविणारे के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय हे विद्यापीठ क्षेत्रातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय ठरले आहे.

पदवी अभ्यासक्रमाच्या प्रॉडक्शन, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, केमिकल, इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक्स आणि सिव्हिल अशा सात विभागांना तीन वर्षांसाठी एनबीए मानांकन मिळाले आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम एमसीएकरिता दोन वर्षांचे मानांकन मिळाले. तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष बरेलीच्या इन्व्हर्टिस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वाय. डी. एस. आर्या होते. समितीत देशाच्या विविध नामांकित विद्यापीठांतील दहा तज्ज्ञांचाही समावेश होता. ऑक्टोबरमध्ये दिल्लीतील आयआयटीचे प्रा. बी. के. बेहरा यांच्या अध्यक्षतेखालील अन्य सहा तज्ज्ञांच्या समितीने महाविद्यालयाला भेट देताना इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल आणि एमसीए विभागांची पाहणी केली. दोन्ही दौऱ्यांचा अहवाल नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रिडिटेशनकडे सादर केला. त्यावर आधारित निकाल जाहीर केला. याचे परीक्षण आउटकम बेस्ड एज्युकेशन (ओबीई) या मूल्यमापन पद्धतीने केले. २००९ पासून एनबीएने या पद्धतीवर आधारित मूल्यांकन सुरू करून आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या मूल्यांकनाशी समकक्ष व्यवस्था निर्माण केली आहे.

### या बाबींचा समितीकडून आढावा

दौऱ्यात तज्ज्ञांनी संस्थेची सुविधायुक्त इमारत, अत्याधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, व्यायामशाळा, मैदान अशा पायाभूत सुविधांसह उत्कृष्ट निकालाची परंपरा, प्लेसमेंटची संख्या व हमी, एनएसएस युनिट, सर्व सुविधांनी परिपूर्ण असे मुला-मुलींचे वसतिगृह, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर, अध्यापनांच्या नवनवीन पद्धतींचा अवलंब, पीएच.डी. प्राध्यापकांची संख्या, उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन अशा विविध बाबींचा आढावा घेत अहवाल तयार केला. भेटीदरम्यान समितीने व्यवस्थापन सदस्य, प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांच्यासह माजी विद्यार्थी आणि औद्योगिक संस्थांच्या प्रतिनिधींशी चर्चा करत महाविद्यालयाबाबतचे अभिप्राय जाणून घेतले.

Nashik, Main
28/12/2019 Page No. 8

# वाघ अभियांत्रिकीच्या आठ विद्याशाखांना एनबीएचे मानांकन

नाशिक : कर्मवीर काकासाहेब वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या आठ विद्या शाखांना एन.बी.ए. चे मानांकन मिळाले आहे. नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रीडेशन (एन.बी.ए.) नवी दिल्ली यांचे महाविद्यालयातील या आठही विद्याशाखांचे वेगवेगळ्या निकषांवर परीक्षण करुन हे मानांकन दिले असून त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्याचा संस्थेच्या स्थापनेचा हेतू सफल होत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी गुरुवारी (दि.२६) पत्रकार परिषदेत सांगितले.

नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रीडेशनच्या प्रक्रियेत १६ ते १८ ऑगस्ट या कालावधीत कॉम्प्युटर, प्रोडक्शन, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन या पाच विभागांचे परीक्षण बरेली येथील इन्व्हरटीस विद्यापाठीचे कुलगुरु डॉ. यज्ञदत्त शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील १० तज्ज्ञांनी केले. तर दुसऱ्या टप्प्यात दि. ११ ते १३ ऑक्टोबर दरम्यान दिल्लीतील आयआयटीचे प्रा. बी. के. बेहरा, आय. आय. टी. दिल्ली यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञांच्या समितीने महाविद्यालयास भेट देऊन इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल आणि एम.सी.ए. या विभागांची पाहणी केली होती. या परीक्षण व मूल्यांकनचे निकाल जाहीर झाले असून त्यानुसार पदवी अभ्यासक्रमाच्या सात विभागांना तीन शैक्षणिक वर्षासाठी एन.बी.ए. मानांकन मिळाले. तसेच एमसीए या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला २ शैक्षणिक वर्षाचे मानांकन मिळाल्याची माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी दिली. यावेळी संस्थेचे समीर वाघ, प्रा. एस. एस. साने, अजिंक्य वाघ आदी उपस्थित होते.

**Lokmat**
**27-12-2019**